महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४९ वे | दिनांक : २३/०५/२०२६ | वार : शनिवार

## राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत पुन्हा एकत्र? : एकाच हॉटेलमध्ये अन् एकाच टेबलवर बसून घेतला चहाचा आस्वाद



**इंदापूर :** एकेकाळी ऊस आंदोलनाच्या मैदानात खांद्याला खांदा लावून लढणारे, मात्र नंतरच्या काळात राजकीयदृष्ट्या एकमेकांपासून दुरावलेले दोन मोठे नेते अनेक वर्षांनंतर जाहीरपणे एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी आणि रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत यांनी इंदापूर न्यायालयाच्या आवारात एकत्र येत चहाचा आस्वाद घेतला.

गेल्या काही वर्षांत या दोन्ही दिग्गज नेत्यांमध्ये मोठे राजकीय मतभेद निर्माण होऊन त्यांच्या वाटा वेगळ्या झाल्या होत्या. मात्र, आज अचानक हे दोघेही एकाच टेबलवर बसून चहा पिताना आणि एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा मारताना दिसल्याने, उपस्थित शेतकरी कार्यकर्त्यांसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांची इंदापूरमधील ही भेट कोणत्याही राजकीय कारणास्तव नसून, एका जुन्या आंदोलनाच्या न्यायालयीन सुनावणीनिमित्त झाली होती. २०११ साली उसाला योग्य भाव मिळावा यासाठी पुकारण्यात आलेल्या तीव्र राज्यव्यापी आंदोलनादरम्यान या दोन्ही नेत्यांसह अनेक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, आणि याच खटल्याच्या सुनावणीच्या तारखेसाठी शुक्रवारी हे दोन्ही नेते इंदापूर सत्र न्यायालयात एकत्र आले होते.

इंदापूर सत्र न्यायालयातील कामकाज संपल्यानंतर सर्वांना एक सुखद धक्का बसला. कारण कोर्टाबाहेर आल्यावर राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांनी चक्क एकाच हॉटेलमध्ये एकत्र बसून चहाचा आस्वाद घेतला. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी काही वेळ मनमोकळ्या गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि अनेक वर्षांनंतर हे दोन जुने सहकारी अशा प्रकारे जाहीरपणे एकत्र आल्याचे पाहून, त्यांना पाहण्यासाठी कोर्टाच्या आवारात कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळली होती.

राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांच्या या चहाच्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले असून, ही भेट केवळ न्यायालयीन कामकाजाच्या तारखेपुरतीच मर्यादित होती की भविष्यातील नव्या राजकीय समीकरणांची नांदी आहे, याबाबत आता तर्कवितर्क लढवले जात आहेत. शेतकरी चळवळीतून पुढे आलेले हे दोन मोठे चेहरे पुन्हा एकदा एकत्र आल्यास राज्याच्या राजकारणावर, विशेषतः ग्रामीण भागात, त्याचा मोठा आणि निर्णायक परिणाम होऊ शकतो, असे जाणकारांचे मत आहे. राज्यात सध्या ऊस दराचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून आगामी गळीत हंगामही तोंडावर आहे. अशा या अत्यंत महत्त्वाच्या काळात महाराष्ट्राच्या शेतकरी चळवळीतील हे दोन आक्रमक नेते एकत्र चहा घेताना दिसल्यामुळे सामान्य शेतकऱ्यांमध्ये नवी आशा पल्लवित झाली असून, त्यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे आगामी काळात राज्यातील शेतकरी आंदोलनाला पुन्हा एकदा नवी धार मिळणार का, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे.

## भाजप नेते प्रसाद लाड यांना मनोज जरांगेंच्या भेटीआधी धमकीचा फोन



**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले असताना भाजप नेते प्रसाद लाड आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नियोजित भेटीपूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये मोठा गोंधळ उडाला. प्रसाद लाड आज अंतरवली सराटीत जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. मात्र त्याआधीच त्यांना धमकीचा फोन आल्याची माहिती समोर आली असून, ते ज्या हॉटेलमध्ये थांबले होते त्या ठिकाणी काही जणांनी घुसण्याचा प्रयत्न केल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन जणांना ताब्यात घेतले आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची भूमिका घेतली आहे. त्यांनी ३० मेपासून अंतरवली सराटीत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप नेते प्रसाद लाड यांनी जरांगेंना उपोषण न करण्याचं आवाहन केलं होतं. त्यानंतर मनोज जरांगेंनी त्यांना थेट अंतरवलीत येऊन चर्चा करण्याचं निमंत्रण दिलं. प्रसाद लाड यांनीही ही विनंती स्वीकारत आज भेट घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान, प्रसाद लाड छत्रपती संभाजीनगरमधील एका हॉटेलमध्ये मुक्कामी असताना धक्कादायक प्रकार घडला. लाड यांच्या पीएला आधी धमकीचा फोन आला होता. योगेश शितोळे पाटील आणि गणेश उगले यांनी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर काही वेळातच दोन जणांनी प्रसाद लाड थांबलेल्या हॉटेलमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली. पोलिसांनी संशयितांना अडवत चौकशी केली असता ते निवेदन देण्यासाठी आल्याचं सांगत होते. मात्र पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. आणखी एक संशयित फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणाबाबत स्वतः प्रसाद लाड यांनी प्रतिक्रिया देताना सांगितलं की, दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे, तर एक जण फरार आहे. हे लोक हॉटेलच्या परिसरात आले होते. पोलिसांनी विचारणा केली असता त्यांनी निवेदन द्यायला आल्याचं सांगितलं. मात्र त्यांची हालचाल संशयास्पद होती. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. या घटनेनंतर पोलिसांनी हॉटेल परिसरात सुरक्षा वाढवली असून पुढील तपास सुरू आहे.

## NEET पेपरफुटी प्रकरणात आणखी एक मोठी कारवाई : पुण्यातून आणखी एका 'मनीषा'ला अटक




**पुणे :** देशभर गाजत असलेल्या नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, या प्रकरणातील एका नव्या मास्टरमाईंडला अटक करण्यात आली आहे. भौतिकशास्त्राचे प्रश्न लीक केल्याप्रकरणी मनीषा संजय हवालदार या महिलेला बेड्या ठोकण्यात आल्या असून, या महत्त्वपूर्ण कारवाईमुळे पेपरफुटीच्या या मोठ्या रॅकेटचे आणखी काही धागेदोरे उघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुण्यातील सेठ हिरालाल सर्फ प्रशालेत कार्यरत असलेल्या मनीषा हवालदार हिला सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून अटक केली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने तिची पेपर प्रक्रियेसाठी तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती, ज्यामुळे तिला भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिकांपर्यंत सहज पोहोचता येत होते. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या मनीषा मांढरे हिच्या संगनमताने तिने भौतिकशास्त्राचे काही प्रश्न लीक केले होते आणि तपासादरम्यान हेच लीक झालेले प्रश्न प्रत्यक्ष नीटच्या प्रश्नपत्रिकेत आल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ३ मे रोजी नीट-यूजी परीक्षेचे आयोजन केले होते. मात्र पेपर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ती रद्द करून आता ही परीक्षा २१ जून रोजी नव्याने घेतली जाणार आहे. या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणाचा तपास सध्या सीबीआय करत असून, त्यांनी धडक कारवाई करत आपले अटकसत्र सुरू ठेवले आहे. मनीषा हवालदार हिच्या अटकेच्या रूपाने सीबीआयने पुण्यातून केलेली ही अकरावी मोठी कारवाई असून, यामुळे या रॅकेटचे आणखी काही धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सीबीआय चौकशीत उघड झाले आहे की, नीटचा पेपर ५ राज्यांमध्ये विकला गेला होता. सर्वाधिक विक्री महाराष्ट्रात झाली आणि दुसऱ्या क्रमांकावर राजस्थान आहे. एजन्सीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीतून आणि डिजिटल गॅजेट्स तपासल्यानंतर ही माहिती समोर आली आहे.

सीबीआयचे म्हणणे आहे की, पुढील आरोपींच्या अटकेनंतर पेपरफुटीचे प्रकरण आणखी मोठे असू शकते. याच कारणामुळे एजन्सीला अजून हे निश्चित करता येत नाहीये की, किती विद्यार्थ्यांनी पेपर विकत घेतला होता. चौकशीत समोर आले आहे की, काही पालकांनी पेपर पुढे इतर लोकांना विकला होता, असे सीबीआयचे म्हणणे आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ मे २०२६


## गुबगुबीत ससोबा

गुबगुबीत ससोबा
तुडविते हिरवे रान
मऊ मऊ अंग
दिसते किती छान

चाहूल लागता
उंचावतो कान
पळत सुटतो
हरपून देहभान

इवलासा जीव
पण मिशी मजेदार
टुण् टुण् उड्या मारत
पाहतोय वारंवार

लाल लाल डोळे
जणू माणिकाचे खडे
लपाछपी खेळतांना
बिळात जाऊन दडे

भित्रा ससोबा
शुद्ध शाकाहारी
गाजर नि भाजीपाला
आवडे त्याला भारी

कासवाशी पैज
लावू नकोस बाबा
झोपेवर नसतो
तुझा मुळीच ताबा




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६ *


## गप्प का बसायचं ?

शिक्षण घेऊन आता
गप्प का बसायचं ?
किती ही दुखलं तरी
सहन का करायचं ? 1

अच्छे दिनाचेच,
वाट का बघायचे.
व्यवस्थेविरुद्ध आता,
सारेच पेटून उठायचे. 2

म्हणेल तितके तुम्ही
कर का भरायचे ?
जागृत होऊन त्यांना
आता धारेवर धरायचे. 3


अन्याय झाले तरी,
का गप्प बसायचे ?
दु:ख सहन करून,
उगीच का हसायचे ? 4

प्रत्येकाच्या मनात,
नि:स्वार्थवृत्ती भरावे.
व्यवस्थेला सर्वांनी,
आता धारेवर धरावे. 5





नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


# माझ्या ऱ्हस्व अन् दीर्घ कविता : मनातली निर्लेप,निस्पृह नितळ तळमळ




कवी 'शंकरसुत' उर्फ प्रा डॉ यशवंत पाटील सर यांच्या प्रगल्भ ज्ञानसाधनेचा अवाका अफाट आहे.संतविवेकी विचार धारा आणि अंभग मानाची नितळ निर्लेप निस्पृह साधना असल्याने ते एक काव्य साधक आहेत.स्वामी चरणी या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध 'आम्हा घरी धन,शब्दची रत्ने' या युक्ती प्रमाणे'जगण्या, वागण्यात, बोलण्यात,आचार-विचार-वर्तनव्यवहारात माधूर्य, लयबद्धता, काव्यमयता, संवेदनशीलता या सर्वांप्रती ममत्व आत्मियता असणाऱ्या सर्व रसिकांना'ही खरी अर्पणपत्रिका ज्ञानसाधक साहित्यसेवेकरी मनाचा ठाव घेते.ही कविता म्हणजे आजचा समकाल व आंतरिक अध्यायन व अध्यापनाचा परिपाक आहे.'पेपरफुटी'ते आजची जगरहाटी अशा ज्वलंत प्रश्नांवर शब्दांगार होऊनही कविता अखंड अंभग स्वरूपात आल्याने तिला ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज परब्रम्हत्व प्राप्त होते आहे.ते म्हणजे कवी 'शंकरसूत' यशवंत पाटील यांच्या मनपानातील ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानावर भाष्य करते.मनाच्या चैतन्य अनुभूतीला ही काव्यमय शिदोरी म्हणजे स्वामीचा प्रसाद आहे.कारण चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक समीक्षक साहित्यिक अभिव्यक्तीची समर्थ वक्ता म्हणून स्वामी समर्थ या अध्यात्म गुरुचरित्राचे संशोधक अभ्यासक असल्याने ही भूमीजनाच्या उध्दाराची कविता आहे.जसे लघू गुरुचे मात्रावृत्ताचे क्रम आहे.ऱ्हस्व लहान दीर्घ मोठा.अगदी या प्रवृत्तीचे मानवी प्रवृत्तीशी संबंध येतो.विचार कधीही भंगत नाही म्हणून सत्संग तो अभंग.या कवितेच्या ओळी म्हणजे मनातील मळभ काढणाऱ्या आहेत.आजच्या मानवी वृत्ती प्रवृत्तीत जो आक्रोश आक्रास्तळेपणा येतो आहे.त्याचे कारणं मनस्थित नाही.'असाध्य ते साध्य करता येते'पैसे देऊन.पण त्याचे लोखंडी पितळं उघडे पडते.तेव्हा कळते.हे ऱ्हस्व,दीर्घपण किती जीवघेणे असते.संत विवेकी विचारांचा जागर ही कविता करतेच पण आजचे वास्तव तुकोबांच्या वाणीतून,ज्ञानीयाच्या ओवीतून,स्वामीजींच्या नामसंकीर्तनून भक्तीचा मार्ग तुझ्या सेवेत आहे.म्हणून हु कविता अतिशय आशय संपन्न सृजन भावनेचा ओलावा देऊन जाते.कवीवर्य 'शंकरसूत' यशवंत पाटील या मायभूमीच्या माणसासाठी माणुसकीचे अंभग मानाचे दर्शन या कवितेतून देतात.मानवी जीवनात दोन अंतरंग आहेत.भाषेच्या वाणी मध्ये जसे रोह आरोह आहे. तसेच जगण्याच्या काना मात्रा वेलांटी ऱ्हस्व दीर्घ जो जाणतो तोच जीवाच्या वाटेवर यशस्वी होतो.या कवितेचा आत्मा हा अंतरिम अंतरंग उलगडून दाखवतोच व आत्मविश्वास देतो.पण हा आजच्या भयंकर वास्तवाचा राक्षसी चेहरा हीयातून दिसून येतो.हा खरंच माणूस आहे का?इतके भंयकर कृत्य करणारा सैतानी चेहरा.इथल्या व्यवस्थेत आहे.या व्यवस्थेचा बिभत्स चेहरा फाडण्याचं काम ही कविता करते.जसे "नीट अन् नेट परीक्षांची पेपर फुटी.नित्य ऐकतो, वाचतो फजिती,काही लाख कोटी परिक्षार्थी दिवस-रात्र करीता १०-१२,तास कठोर अभ्यास"(पृ.३)ही सखेद वास्तवाची वेदना घेऊन ही कविता आली आहे.या कवितेचा विषय ऱ्हस्व मध्ये रामराज्य, प्रदूषण, पेपरफुटी, लोककल्याणकारी राजा,सत्य अन् असत्य, लोकशाही रामराज्य, प्रिय तिरंगा, लक्षातठेवावं,मोफतगिरी,'बहिणीचं चांगभलं'आघाड्या बिघाड्या,पितृपक्ष पंधरवडा,या अंभग रचना अतिशय उत्तम आशय देऊन आजचे वास्तव मांडतात.सत्य बोलू काही मनातले तोलू काही स्वामीची ग्वाही जन देती.या पवित्र नेत्राने मनाला नितळ श्रेध्दय भावनेचं काही दिसतं नाही तेव्हा कवीची तळमळ ही नित्याचीच बाब झाली आहे.रोजचे रोझ (गुलाब)बघावे तेमनाला पवित्र करून जाते.बालकांचे लडीवाळ हसणे तोआनंद मनाच्या देवाऱ्याचा आहे.पण तिथे वासनांध क्रुरकर्माने जर घेतला तर क्षणभंगुर या मनुष्य जीवनाचे या मातीच्या उदरातही जागा नाही.भरस्त्यावर कुत्र्यांच्या मौतीने मरणारी माणसं या भंयकर व्यवस्थेत पाह्यला मिळतात.कवी शंकरसूत इतक्या हळुवारपणे गहिवरून आपल्या सृजनशील स्नेहाळू भावनेचा ओलावा ऱ्हस्व लघूउच्चाराने ही सविनय अभंग कविता अतिशय मौलिक अधिष्ठान प्राप्त करते.अभिजात मराठी,कवी-कवयित्री, संसाराचा रथ, कात्री आणि सुई, हानिकारक,स्मरू या म.गांधीना,निंदा आणि स्तुती,हंगाम निवडणूकीचा, शिक्षण लोकशाही जतन,असे विविधरंगी शब्दफुलांची उधळण ही कविता तर करतेच भारतीयांच्या दृष्टीने आपल्या लोकशाही संविधानिक प्रजासत्ताक्तेचा समतेचा संदेश ही कविता देऊन जाते.जसे"कर्मकांड रूढी परंपरा,जाती-पाती,अंधश्रद्धा,अव्हेरुनी सज्जन उध्दारा, ब्राह्मांडनायकश्री स्वामी समर्था, शतकानुशतके कष्टत राहिलात. भक्त वत्सल भक्ताभिमानी स्वामीला हृदयमंदिरी स्थापू चला.सर्वज्ञ, सर्वसिध्दी वश असलेला,सोंगा ढोंगावर प्रहार करणारा,लफांग्या भामट्यांचे बिंग फोडणारा गुणवंत शिलवंत, ज्ञानवंतला जपणाऱ्या भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे.हम गया नही जिंदा है!"अशी निस्सीम भक्तीची ही कविता आहे.यामुळेकुलवंत,शिलवंत,ज्ञानीवंत गुणवंत भाग्यवंत अक्षयवंत होऊन ही कविता अक्षरमय झाली आहे.या कवितेची सृजन मनोभूमिकेतून लिहिलेली प्रस्तावना "डॉ पाटील सरांची कविता समाजाला आरसा दाखवणारी आहे.महाभारत व रामायण हे महाकाव्यांच्या स्वरूपातचं लिहिले गेले इतकी उज्ज्वल कवितेची परंपरा आहे व परंपरेला आणखी उजळ उज्ज्वल करण्याचे काम ऱ्हस्व कविता करते.ज्ञानीयाचा या तुक्याचा तोच माझा वंश आहे.. माझिया रक्तात थोडा ईश्वरांचा अंश आहे' मनाचा ठाव घेणारी कविता -(कवी प्रशांत दामोदर भरवीरकर) ही मनस्वी भावना प्रस्तावनेत आहे.या कवितेचा सर्वव्यापी विषयाच्या अनुषंगाने विचार केला तर, "घर देता का? हो घर,? तुमची तर इथे तिथे सर्वत्र या शहरात, त्या महानगरात. त्या तालुका, जिल्हा, राज्यात घरे, फ्लॅटस्, फार्म हाऊसेस आहेत म्हणे अनेक त्यातील एखादे,घर देता का हो घर?"(पृ.११२) मानवतेचा कैवारघेऊन ही कविता येतेच पण प्रखर वास्तववादी संतविवेकी विचारांची बांधिलकी हे या कवितेचे मुख्य सुत्र आहे.साहित्यिक, समीक्षक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ सदस्य डॉ नरसिंग कदम सर लिहितात "इथे खोटे बोलणाऱ्याला मोका आणि खरं बोलणाऱ्याला धोका आहे.हिच जगराहटी बनत चालली आहे.असं असतानाही कवी झगमगाटाच्या मागे न धावता रामराज्याची अपेक्षा करतात.लोकशाही मुल्य रुजवतात.ज्ञानाला नम्रतेची जोड मिळाली की,ख्याती व्हायला वेळ लागत नाही.धनाला दयेची जोड मिळालीकी, प्रगती व्हायला वेळ लागत नाही.तसेचं मनाला अहंकाराची जोड मिळाली की,माणसाची माती व्हायला वेळ लागत नाही.असा अनमोल मार्ग कवी पाटील यांनी दाखवून दिला आहे"(पृ १३) मानवी मूल्येची पेरणी कधी ऱ्हस्व तर कधी दीर्घ.कारण त्यांच्या अंत:करणात केवळ एक अध्यायन निष्ठता असल्याने ही विचारांची शिदोरी घेऊन एक निस्सीम स्वामी भक्ती म्हणजे आढळ श्रध्दास्थान जे काव्यलेखन सेवेतून निष्ठावंत भक्ती करीत ही निधर्मो निर्धार पुर्वक सत्यनिष्ठ भूमिकेतून ही कविता आली आहे.मलपृष्ठ (ब्लर्ब) म्हणजे कवीच्या कवितेला शब्दांची पाठराखण कवी 'प्रदत्त' प्रभाकर खांडेकर लिहितात "डॉ पाटील यांच्या कविता वर्तमानातील वास्तवाचे भयान रुप दाखवतात.उपेक्षितांच्या वेदना प्रतिबिंबित करतात.समाजात वाढणारी सहिष्णुता, काळीमा फासणाऱ्या दांभिक, राजकीय व्यवस्थेला चपराक देतात त्यामुळे सामाजिक बौद्धिक व वैचारिक दिशा देणारा हा काव्यसंग्रह आहे"(मलपृष्ठ)या पुस्तकाची निर्मिती ही ज्ञानपथ प्रकाशनचे सुनील सुकलकर यांनी अतिशय देखणी केली आहे.कवी 'शंकरसूत' डॉ यशवंत पाटील सरांना मनस्वी शुभेच्छा.स्वामी भक्तीनी ही कविता अवश्य वाचवी.



**काव्यसंग्रह:-माझ्या ऱ्हस्व आणि दीर्घ कविता**
**कवीवर्य:-शंकरसुत डॉ यशवंत पाटील, नाशिक**
**प्रकाशक:-ज्ञानपथ प्रकाशन, अमरावती**
**प्रथमवृती:-१५ एप्रिल २०२६**
**किमत:-२५०/रुपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ मे २०२६

# उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**बीड (भगवंत पाळवदे) :** भारत निवडणूक आयोगाने (उस्मानाबाद-लातूर-बीड) स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा केली आहे. याबाबत धाराशिव जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली. निवडणुकीची अधिसूचना दि. २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत दि. १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी दि. २ जून रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. मतदान दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी होईल. निवडणूक प्रक्रिया दि. २५ जून २०२६ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. असे उप जिल्हा निवडणूक अधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

# उन्हाळी सुट्टी : मुलांमध्ये वाचनाची सवय रुजवण्याची संधी

उन्हाळ्याची सुट्टी हा मुलांसाठी आनंद मिळवणे, विश्रांती घेणे आणि नव्या गोष्टी शिकणे या साठीचा उपयुक्त काळ असतो. या काळात मुलांनी वेळेचा योग्य उपयोग करत काही चांगल्या सवयी आत्मसात केल्यास त्याचा लाभ त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच होऊ शकतो. अशाच लाभदायक सवयींपैकी एक महत्त्वाची सवय म्हणजे वाचनाची सवय होय.आजच्या आधुनिक युगात मोबाईल, टेलिव्हिजन आणि इतर डिजिटल साधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. मुले आपला अधिकाधिक वेळ यांच्या वापरात घालवत असतात. यामुळे त्यांचा मैदानावरचा वावर फारच कमी कमी होत चालला आहे. ज्या मुलांस क्रीडा क्षेत्रात जायचे आहे अशीच मुले मैदानावर सराव करताना दिसतात. बाकीचे मुले मात्र मैदानावर अभावानेच हजेरी लावतात. हातातील मोबाईलवर मनोरंजन आणि माहितीचे सारे स्रोत उपलब्ध असल्याने मुलांचे पुस्तक वाचन देखील अतिशय कमी झाले आहे. किंबहुना नाहीसे झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. मुलांनी पुस्तकांशी मैत्री करणे त्यांच्या जडणघडणीसाठी खूप आवश्यक बाब आहे. उन्हाळी सुट्टीत दररोज थोडा वेळ वाचनासाठी राखून ठेवल्याचे खूप फायदे आहेत. वाचनामुळे मुलांच्या भाषिक विकासास चालना मिळते, त्यांची विचारशक्ती विकसित होते आणि कल्पनाशक्तीलाही नवे पंख लाभतात.मुलांना त्यांच्या आवडीनुसार गोष्टींची पुस्तके, प्रेरणादायी कथा, विज्ञानविषयक माहिती, चरित्रे तसेच चित्रमय पुस्तके वाचण्यास पालकांनी प्रोत्साहित करावे .वाचनामुळे शब्दसंपत्ती वाढते, एकाग्रता सुधारते आणि स्वतःचे विचार स्पष्टपणे मांडण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होत असते.यामध्ये पालक आणि शिक्षक यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांसोबत वाचन करणे, पुस्तकांबाबत संवाद साधणे किंवा वाचलेल्या गोष्टींवर चर्चा करणे यामुळे मुलांमध्ये वाचनाची गोडी लागू शकते. दररोज काही वेळ पुस्तक वाचनासाठी देण्याची सवय मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरते.उन्हाळी सुट्टी ही केवळ विश्रांतीचा काळ नसून व्यक्तिमत्त्व विकासाची एक उत्तम संधीदेखील आहे. त्यामुळे या सुट्टीत मुलांना पुस्तकांच्या सहवासाची ओळख करून देऊन वाचनाची सुसंस्कारित सवय लावण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करणे आवश्यक आहे. ज्ञान, संस्कार आणि सर्जनशीलतेकडे नेणारा हा मार्ग मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल. आपल्या देशात आणि राज्यातही महापुरुषांची वानवा नाही. सम्राट अशोक, संत कबीर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले सावित्रीबाई फुले, पेरियार, नेल्सन मंडेला, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे, आगरकर, प्रबोधनकार ठाकरे, माता जिजाऊ, देवी अहिल्याबाई होळकर अशा महान व्यक्तिमत्वांची चरित्रे वाचण्यास देऊन मुलांमध्ये चारित्र्य, सचोटी, स्त्री पुरुष समानता, सामाजिक न्याय, देशप्रेम अशा गुणांचे संस्कार वृद्धिंगत करता येतील. शिवाय मराठीतील बाल साहित्यही त्यांना वाचायला दिल्यास त्यांना मराठी भाषेची गोडी लागेल.

**~ मोनाली गुजराथी**






# वाढदिवसानिमित्त शाळा परिसरात वृक्षारोपण




**खुलताबाद (वार्ताहर):** घोडेगाव (ता. खुलताबाद) येथील प्रोग्रेसिव्ह व्हिजन सेमी इंग्लिश स्कूल परिसरात विद्यार्थिनी सफुरा मिर्झा हिच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

गोलेगावचे उपसरपंच संतोष जोशी यांनी वाढदिवसानिमित्त झाड लावण्याचे आवाहन करून पर्यावरण संवर्धनाची प्रेरणादायी परंपरा जपण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमादरम्यान शाळा परिसरात विविध रोपांची लागवड करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण व हरित परिसर निर्मितीचा संदेश देण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि उपस्थित नागरिकांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विषद केले.

विद्यालय प्रशासन अधिकारी जाकिर सिद्दीकी यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी समाज व पर्यावरण हितासाठी केलेले असे उपक्रम प्रेरणादायी असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येकाने निसर्ग संवर्धनासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. केंद्रीय विद्यालयाचे शिक्षक आरिफ बेग यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अशा कार्यक्रमांमधून स्वच्छ पर्यावरण, हरित भविष्य आणि निसर्ग संरक्षणाचा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचतो.

या प्रसंगी कलीम बेग, आसिफ बेग, इम्रान बेग, जुबेर बेग, इरफान बेग, तहरीन बेग यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# "धन नको, दौलत नको"

माणसं जोडायची मला
धन नको, दौलत नको, माणसं जोडायची मला,
हसऱ्या चेहऱ्यांच्या गावात, प्रेम पेरायचं मला।
सोने-चांदीच्या राशीपेक्षा, शब्द जिव्हाळ्याचे हवे,
मनामनांतले पूल बांधत, आयुष्य जगायचं मला॥

नको महाल उंच आकाशी, नको झगमगती दारे,
चार माणसांच्या प्रेमामध्ये, सुखाचे दिसती तारे।
थंड सावली बनून थोडं, कुणासाठी थांबायचं,
अश्रूंमध्ये हात धरून, दुःख हलकं करायचं॥

नको प्रसिद्धी मोठी-मोठी, नको नाव वृत्तपत्री,
माझ्या जाण्याने कुणाच्या डोळ्यांत, यावी ओल आपुलकीची।
इतकीच ठेवू शिदोरी मी, मनामध्ये प्रेमाची,
वाट चालताना मिळावी, माणसं माणुसकीची॥

जगण्यातले खरे दागिने, नाती जपलेली असती,
पैशाच्या त्या बाजारातही, माणसं हरवलेली दिसती।
मी मात्र शोधत फिरतोय, जिवाभावाचे धागे,
मनाशी मन जोडताना, सारे अंतर होती पळे॥

जेव्हा वेळ कठीण येते, धन साथ देत नाही,
आपुलकीचा हात मात्र, कधीच दूर जात नाही।
जखमांवरती फुंकर घालणं, हेच खरे श्रीमंती,
हृदयामध्ये प्रेम असेल, तिथेच खरी संपत्ती॥

भुकेल्याला घास द्यावा, तहानेल्याला पाणी,
दुःखातल्या त्या जीवासाठी, व्हावं थोडंसं चांदणी।
देव शोधू नये दगडांत, देव माणसांत असतो,
प्रेमाच्या एका स्पर्शाने, जीव नव्याने फुलतो॥

मला नकोत मोठे हिशोब, नफा-तोट्याच्या गोष्टी,
माणूस म्हणून जगण्यातच, दडलेल्या खऱ्या समृद्धी।
हसत-खेळत दिवस जावेत, ओठांवर गाणी असावी,
जाताना माझ्या मागे फक्त, माणसांची आठवण रहावी॥

धन नको, दौलत नको, माणसं जोडायची मला,
मनाच्या या ओल्या मातीत, प्रेम रुजवायचं मला।
स्वार्थाच्या या गर्दीमध्ये, दीप माणुसकीचा व्हायचं,
साऱ्या जगाला आपलंसं करत, आयुष्य जगायचं मला॥



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २३ मे २०२६


## सोशल मीडियावरील काक्रोज जनता पार्टीकडे भारतीय तरुणांचा कल

**आज** ,सध्या भारतीय तरुणांचा सोशल मीडियावरील कॉकरोच जनता पार्टीकडे वाढता कल असून सर्व तरुणांना आपलीशी, जवळची वाटणारी .....काक्रोज जनता पार्टी आहे. तरुणांमध्ये वाढती बेरोजगारी, रोजी- रोटीचा संघर्ष, या समस्या मोठ्या प्रमाणावर असून त्यामुळे तरुणाईमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय सत्तांतर होऊन अनेक पक्षांची सरकार आलीत, तरीही मूलभूत प्रश्न जनतेचे सुट शकले नाहीत. आजही सर्व सामान्य शहरी व ग्रामीण माणसांना रोजी- रोटी साठी, रोजगारासाठी संघर्ष करावाच लागतो . उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही उद्योगधंद्यासाठी भांडवल उपलब्ध होत नाही, फक्त देशात मुठभर लोकांच्या हाती सत्ता असून, त्यांचीच मुले उद्योग- धंद्यात दिसतात देशातील 70% तरुण वन- वन रोजगारासाठी भटकतो. बऱ्याचश्या तरुणांना परदेशात नोकरी -धंद्यासाठी जावे लागते, तिथेही तेच स्थिर नाहीत ,अशा परिस्थितीत भारतीय तरुणांना सोशल मीडियावरील काक्रोज जनता पार्टी कडून आशेचा किरण दिसत आहे. आज देशात भ्रष्टाचार, आफरा - तफर,मोठ्या प्रमाणावर शासकीय, व सहकार क्षेत्रामध्ये दिसतो. अनेक मंत्री - लोकप्रतिनिधी घोटाळेबाज आहेत. देशात बुवाबाजीचे मोठे पीक आलेले आहे. देशात बुवा आणि राजकीय पुढारीच श्रीमंत मालदार आहेत, मुठभर लोक श्रीमंत असून, उर्वरित जनता गरीब आहे. जीवन जगण्यासाठी मध्यमवर्गीय कुटुंबाची तर तारेवरची कसरत आहे. देशात श्रीमंत, श्रीमंत होत आहेत, गरीब मात्र गरीबच आहेत. देशाची अर्थव्यवस्था ढासळू पाहत आहे. महागाई वाढत आहे, शेतकरी बेहाल आहेत. शेतीच्या मशागतीसाठी डिझेल मिळण्यासाठी त्यांना या पंपावरनं त्या पंपावर भटकावे लागत आहे, शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, अनेक प्रकारची नैसर्गिक संकटे व आपत्ती येत आहे,तरीही सरकारला त्यांची दया येत नाही. आजच्या अशा दुर्दैवी परिस्थितीत लोकांना सोशल मीडियावरील काक्रोच जनता पार्टी जवळची वाटते. आजच्या सामाजिक विषम परिस्थितीत आपला आवाज बुलंद करण्यासाठी, लहानांपासून मोठ्यांपर्यंत काक्रज पार्टीचे आकर्षण निर्माण झाले असून, त्याची सर्वत्र देशभर चर्चा आहे. भारतीय युवकांना सत्तेत काक्रोज जनता पार्टी हवी आहे. नेपाळ सारखे सुशासन व प्रशासन भारत देशात निर्माण व्हावे अशी सर्व सामान्यांची इच्छा आहे. पेट्रोल पंपा समोर रांगेत उभी असलेले तरुण काक्रोस पार्टी जिंदाबाद च्या घोषणा देत आहेत. देशातील सरकार लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही, ते अपयशी आहे. त्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. अशी सर्वसामान्य युवकांची प्रतिक्रिया आहे ,अनेक युवकांशी संवाद साधताना आपल्या भारत देशात काक्रोज जनता पार्टीचे सरकार यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे, सध्याच्या उद्भवलेल्या परिस्थितीत तरुणांची मागणी गैर वाटत नाही. एका खटल्याचा निकाल देते प्रसंगी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी तरुणांची तुलना काक्रोज म्हणजे झुरळाशी केली. याचा प्रचंड राग तरुणाईला आला आहे, दुसऱ्या दिवशी न्यायाधीशांनी दिलेले स्पष्टीकरण त्यांना धातुर- मातुर वाटते. विचार करा....भारतीय तरुण काक्रोज आहेत का... असा तरुणाईचा अपमान करणे योग्य आहे का... तरुणाईचा अपमान करण्याचे अधिकार यांना कोणी दिले असे मत अनेक युवकांनी व्यक्त केले आहे , सध्या अनेक प्रश्न तरुणां समोर आ वासून उभे आहेत, म्हणून भारतीय तरुणांमध्ये खदखद व्यक्त होत आहे. संतोष निर्माण झाला आहे, या घटनेचा प्रचंड राग तरुण पिढीला आला आहे, या घटनेतून कॉक्रोज जनता पार्टीचा जन्म झाला. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील पिंपरी चे ,सध्या अमेरिकेत उच्च शिक्षण घेणाऱ्या श्री. अभिजीत दिपकेच्या सोशल मीडियावरील काक्रोज जनता पार्टीला संपूर्ण देशातून वाढता प्रतिसाद मिळत आहे. आज सोशल मीडियावर 87 लाखाहूनही जास्त ,त्याचे फॉलोवर्स आहेत, प्रत्येक तासा-तासाला फॉलोवर ची संख्या वाढत आहे, अनेक राजकीय पक्षांच्या फॉलोवर्सपेक्षा त्यांची संख्या जास्त आहे. श्री .अभिजीत दिपके हा मराठी मुलखाचा महाराष्ट्राचा तरुण असून, त्याचे उच्च शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे झालेले आहे .पुढील शिक्षणासाठी तो अमेरिकेत सध्या वास्तव्यास आहे. एक भारतीय युवक अमेरिकेत राहून आपल्या मायदेशातील तरुणांविषयी आस्था बाळगून, काहीतरी नाविन्यपूर्ण करतो, त्यातूनच सोशल मीडियाच्या माध्यमातून काक्रोच जनता पार्टी जन्माला येते, याचे सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे.



**-प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे**
**जालना.**

## जुन्या रिक्षांचे होणार इलेक्ट्रिक रिक्षात रुपांतर



**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे रिक्षा चालकांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपाय म्हणून सरकारने जुन्या रिक्षांचे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षात रुपांतर करण्यावर गांभिर्याने विचार सुरू केला आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या अभिनव उपक्रमाची माहिती दिली.

मंत्रालयात पेट्रोल, सीएनजीवर चालणाऱ्या जुन्या रिक्षाचे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षामध्ये रूपांतर करणे आणि ईव्ही चार्जिंग सुविधा निर्माण करण्याबाबत शुक्रवारी एक बैठक आयोजित केली होती. यावेळी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, सहआयुक्त संदेश चव्हाण, महानगर गॅसचे मुख्य व्यवस्थापक मुकेश पन्होत्रा, मुख्य वित्त अधिकारी राजेश पटेल, श्री ईव्ही इंडस्ट्रीजचे संचालक करण कडाबा, सल्लागार महेश कडाबा, एक्सपोनंट एनर्जीचे अक्षत मोदी, इको सिस्टमचे इशांत मजबूदार उपस्थित होते.

यावेळी प्रताप सरनाईक म्हणाले, पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षा ही संकल्पना शहरी भागात काळाची गरज झाली आहे. ईव्ही पॉलिसी धोरणानुसार ईव्ही गाड्या रस्त्यावर आणण्याचे शासनाचे धोरण आहे. राज्यात असलेल्या रिक्षांची माहिती घ्या. चार ईव्ही कंपन्या असल्याने सर्वांना संधी द्यायची आहे. रिक्षा चालकांना परवडेल अशा किंमतीमध्ये ईव्ही रिक्षा तयार करा. ईव्ही रिक्षांच्या चार्जिंगसाठी महानगर गॅसच्या जागांचा वापर करता येईल. परिवहन विभागाकडून पाच वर्षांसाठी परवाना वाढवून देण्याचा प्रयत्न करू, मात्र रिक्षावाल्यांना एकदम पैसे भरणे परवडणार नसल्याने चार्जिंग आणि किटसाठी रोज पैसे घेण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन, गॅसचे दर वाढले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. इंधन आणि सीएनजीच्या खर्चात बचत होऊन रिक्षा चालकांना दिलासा देण्यासाठी जुन्या रिक्षाचे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षात रूपांतराबाबत शासन सकारात्मक आहे, असे सरनाईक यांनी सांगितले.

श्री ईव्हीचे संचालक करण कडाबा यांनी सादरीकरणातून कंपनीची माहिती दिली. जुन्या रिक्षांचे इलेक्ट्रिक रिक्षामध्ये रूपांतर आणि चार्जिंगबाबत श्री ईव्ही आणि महानगर गॅसमध्ये दोन वर्षांपासून सामंजस्य करार करण्यात आला आहे. आतापर्यंत ४४७ जुन्या रिक्षाचे इलेक्ट्रिक रिक्षात रूपांतर केले असून बॅटरीची पाच वर्षांची वॉरंटी आहे. याचा खर्च दोन लाख असून मायलेज १४० किमी आहे. यातून इंधन, सीएनजी बचतीबरोबर वर्षाला ५५ ते ७५ हजार रूपयांची रिक्षा मालकांची बचत होत असल्याचे कडाबा यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर, पुणे, नाशिक, नागपूरमध्ये तर दुसऱ्या टप्प्यात संपूर्ण राज्यात दोन लाख रिक्षा रिट्रोफिटेड (रूपांतरित) करण्याचे ध्येय असून मुंबईला रिट्रीफिट कॅपिटल करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002